I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 173 B.N.S.S)**

## प्रथम खबर अहवाल

**(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)**

1. **District (जिल्हा):** सोलापुर शहर **P.S. (पोलीस ठाणे):** सलगर वस्ती **Year (वर्ष):** 2026

**FIR No. (प्रथम खबर क्र.):** 0230 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 13/07/2026 16:08 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):**

1 **Day (दिवस):** मंगळवार **Date from (दिनांक पासून):** 26/05/2026 **Date To (दिनांक पर्यंत):** 26/05/2026

**Time Period (कालावधी):** **Time From (वेळेपासून):** 11:35 तास **Time To (वेळेपर्यंत):** 17:32 तास

(b) **Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):** **Date (दिनांक):** 13/07/2026 **Time (वेळ):** 15:30 तास

(c) **General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):** **Entry No. (नोंद क्र.):** 023 **Date and Time (दिनांक आणि वेळ):** 13/07/2026 16:08 तास

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1. **(a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर):** पश्चिम, 6 कि.मी. **Beat No. (बीट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** बेलाटी येथील श्री सोमनाथ काळे , यांच्या शेतामध्ये, ताउ सोलापूर,जि सोलापूर,

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)

**(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (State) (जिल्हा (राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** प्रशांत रामचंद्र चौगुले

(b) **Father's/Husband's Name (वडिलांचे/पतीचे नाव):**

(c) **Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष):** 1982 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No. (पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख ):** **Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))**

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

(h) **Occupation (व्यवसाय):**

(i) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सोलापूर, सलगर वस्ती, सोलापुर शहर, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सोलापूर, सलगर वस्ती, सोलापुर शहर, महाराष्ट्र, भारत |

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल क्र.):** 91-9823225465

7. **Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):**

**Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या):** 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | विजयकुमार जंगप्पा माने | | | 1. तिहे,Town/Village (शहर / गाव): उत्तर सोलापूर,Tehsil (तहसील): Police Station (पोलीस ठाणे): सलगर वस्ती,District (जिल्हा): सोलापुर शहर,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S. No. (अ.क्र.) | Propertty Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| | | | | |

10. **Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :**

11. **Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):**

| S. No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकिगत):**

फिर्याद दि.13/07/2026

मी प्रशांत रामचंद्र चौगुले, वय - 44 वर्षे, व्यवसाय नोकरी, पद-पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सोलापूर मो.नं.9823225465 समक्ष फिर्याद देतो की, मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सोलापूर युनिट येथे माहे मे 2025 पासून पोलीस उप अधीक्षक या पदावर कार्यरत आहे. दि.25/05/2026 रोजी सायंकाळच्या सुमारास तक्रारदार नामे विश्वजीत बिरु गायकवाड, वय - 25,

व्यवसाय- शेती, रा.डोणगाव, ता.उत्तर सोलापूर हे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सोलापूर कार्यालयात येऊन आमची भेट घेतली आणि ते मुरूम वाहतूक व्यवसायासाठी दुस-यांकडून भाडयाने गाडया घेऊन शेतक-यांच्या शेतामधील उपसा केलेला मुरूम वाहून विक्री करण्याचे व्यवसाय करीत असल्याचे सांगुन मौजे बेलाटी गावातील श्री सोमनाथ श्रीरंग काळे यांनी त्यांचे बेलाटी येथील गट नं.163/1/क/1/ब येथील शेतामध्ये विहिर खोदकाम केले असून त्यातून निघालेले मुरूम भराव उचलणे व वाहतूक करण्याची परवानगी मिळणेकरीता त्यांनी मा.तहसीलदार, उत्तर सोलापूर यांना दि.08/05/2026 रोजी अर्ज दिला होता. सदर अर्जाच्या अनुषंगाने मा.तहसीलदार यांनी ति-हे येथील मंडल अधिकारी यांना स्थळपाहणी करून फोटोसह अहवाल सादर करणेबाबत आदेश दिला होता. त्यानंतर तक्रारदार गायकवाड यांनी श्री सोमनाथ श्रीरंग काळे यांच्या शेतामधील विहिर खोदकामातून निघालेले मुरूम वाहतूक करण्यास व वापर करण्याकरीता त्यांच्याशी करारपत्र केले असून श्री सोमनाथ काळे यांनी तहसील कार्यालयास दिलेल्या अर्जाच्या अनुषंगाने तक्रारदार गायकवाड यांनी ति-हे येथील मंडल अधिकारी श्री माने यांची भेट घेतली असता त्यांनी विहीरीच्या स्थळी भेट देऊन स्थळपाहणी पंचनामा करून तहसील कार्यालयास सादर करतो, त्याकरीता रॉयल्टीचे जवळपास 35,000/- रू होत असून, रॉयल्टीची रक्कम तहसील कार्यालयास भरावे लागतील असे सांगून घटनास्थळी येऊन स्थळपाहणी पंचनामा व फोटो काढून तहसील कार्यालयास अहवाल सादर करण्यासाठी 1,00,000/- रू द्यावे लागतील असे बोलून लाचेची मागणी करीत असल्याचे तक्रार सांगितले. त्यानंतर आम्ही पोनि लांभाते यांना सदर तक्रारीची दि.26/05/2026 रोजी पडताळणी करण्याचे आदेश दिले.

पोनि लांभाते यांनी अंमलदारामार्फतीने उपवनसंरक्षक, वन विभाग, सोलापूर या कार्यालयास पंच मिळणेबाबत केलेल्या पत्रव्यवहाराच्या अनुषंगाने दि.26/05/2026 रोजी 1) मुकुंद बाळासाहेब होळकर, पद- लिपीक व 2) अविनाश संतोष पुंड, पद- लिपीक असे दोन शासकीय पंच साक्षीदार 09.30 वा चे सुमारास ला.प्र.वि कार्यालयात हजर झाले. यादरम्यान तक्रारदार गायकवाड हे सुध्दा ला.प्र.वि कार्यालयात उपस्थित झाल्यावर आम्ही, दोन्ही पंचाची तक्रारदार यांच्याशी ओळख करून दिली आणि तक्रारदार यांना त्याची तक्रार पंचासमक्ष कथन करण्यास सांगितले असता त्यांनी वरीलप्रमाणे तक्रार सांगुन लेखी तक्रार दिली. त्यानंतर आम्ही दोन्ही पंच साक्षीदार यांना तक्रारदार यांच्या तक्रारीची पडताळणीकरीता पंच म्हणून उपस्थित राहून काम करणेसाठी त्यांची संमती घेतली. सदर लेखी तक्रारीवर दोन्ही पंच साक्षीदार व सापळा अधिकारी पोनि लांभाते यांनी सह्या केल्या. पडताळणी कारवाईसाठी पंच क्र.1 म्हणून मुकुंद बाळासाहेब होळकर व पंच क्र. 2 म्हणून अविनाश संतोष पुंड यांनी काम पाहण्याचे ठरले. त्यानंतर पोनि लांभाते यांनी तक्रारदार गायकवाड, दोन्ही पंच साक्षीदार यांना त्यांचेकडील सोनी कंपनीचे IC RECORDER ICD-UX570F 5V SONY CORP. MADE IN CHINA 1080938 व्हाईस रेकॉर्डर व HIKVISION कंपनीचे 08 जीबीचे मेमरीकार्ड, सदर मेमरीकार्डवर MICRO SD HC V10 I 8GB HIKVISION त्याच्या मागील बाजूस YBW08S0122ZF HS2538008G असे वर्णनाचे नवीन मेमरीकार्ड दाखवुन त्यांचा वापर व उपयोग समजावून सांगितला. त्यानंतर तक्रारदार व पंचांना पडताळणीसाठी रवाना करण्यापुर्वी त्यांचे निवेदन घेताना त्याचे व्हिडीओ चित्रीकरण करण्यासाठी आणखीन एक HIKVISION कंपनीचे 08 जीबीचे मेमरीकार्ड, सदर मेमरीकार्डवर MICRO SD HC V10 I 8GB HIKVISION त्याच्या मागील बाजूस YBW08S0122ZF HS2538008G असे वर्णनाचे मेमरीकार्ड त्याचे पाकीटातून काढून ते मेमरीकार्ड पोना/30 नरोटे यांचे

सॅमसंग गॅलक्सी ए-23 कंपनीचे मोबाईलमध्ये टाकून मोबाईलचे स्टोरेज पाथ एस.डी कार्ड सिलेक्ट केला. त्यानंतर पोनि लांभाते यांनी तक्रारदार गायकवाड व दोन्ही पंचांचे पडताळणीपुर्व निवेदन 11.35 वा चे सुमारास व्हॉईसरेकॉर्डरद्वारे रेकॉर्ड करून घेतले. त्यावेळी निवेदनाचे व्हिडीओ चित्रीकरण वर नमुद मोबाईलच्या माध्यमातून पोह/30 नरोटे यांनी केले.

त्यानंतर पोनि लांभाते यांनी तक्रारदार गायकवाड यांना मंडल अधिकारी माने यांच्या भेटीचे ठिकाण निश्चित करण्यासाठी त्यांना फोन करण्यास सांगितले असता तक्रारदार गायकवाड यांनी त्यांचे मो.क्र.9665902034 वरुन मंडल अधिकारी माने यांचे मो.क्र.9028538264 यावर 11.43 वा. कॉल केला. त्यावेळी पोनि लांभाते यांनी सदर फोनवरील संभाषण ध्वनीमुद्रीत करणेसाठी व्हॉईस रेकॉर्डर ऑन करून फोन जवळ धरले परंतु मंडल अधिकारी माने यांनी तक्रारदार यांचा फोन उचलला नाही. त्यानंतर तक्रारदार यांनी 11.45 वा. व्हॉट्सअँप कॉल करून फोन स्पीकर मोडवर ठेवले असता मंडल अधिकारी माने यांनी व्हॉट्सअँप कॉल उचलला. त्यावेळी तक्रारदार यांनी हा साहेब कधी येणार हाव अशी विचारणा केली असता, मंडल अधिकारी माने यांनी फोन करतो मी जरा थांब..ति--हामध्ये हाय मी थोडा वेळ लागेल असे तक्रारदार यांना सागुन फोन बंद केला. त्यानंतर सुमारे 11.50 वा. चे सुमारास मंडल अधिकारी माने यांनी तक्रारदार गायकवाड यांचे मोबाईल व्हॉट्सअँप वर मिसकॉल दिला. त्यावेळी पोनि लांभाते यांच्या सुचनेवरून 11.51 वा. तक्रारदार यांनी वरील नमुद मोबाईल क्रमांकाचे व्हॉट्सअँपवरून मंडल अधिकारी माने यांच्या व्हॉट्सअँपवर फोन करून स्पिकर मोडवर ठेवले. त्यावेळी मंडल अधिकारी माने यांनी ते एक माणुस बुडालाय.. हं..एक मणुस बुडालाय त्यला जरा काढायच चाललय..येतो मी थोडया वेळान..येतो मी दुपारी तासाभरानी वगैरे..असे सांगितले. त्यावर तक्रारदार यांनी बरं..बरं..बरं..चालल मग..थांबतो मी हित बेलाटीला..बेलाटीतच थांबतो.. असे सांगितले. त्यावर मंडल अधिकारी माने यांनी हं सांग..हं सांगू आण तलाठी भाऊसाहेब ला सांगून ठेव असे बोलून तक्रारदार यांना तलाठी यांना सांगुन ठेव असे सांगितले. त्यावर तक्रारदार यांनी बरं.. बरं..चालतय हो..असे बोलून फोन बंद केला. पोनि लांभाते यांनी सदरचे संभाषण व्हॉईसरेकॉर्डरच्या माध्यमातून रेकॉर्ड करून घेतले.

मंडल अधिकारी माने यांनी बेलाटीला येतो असे सांगितले असल्याने बेलाटी गावाच्या अलीकडे जाऊन मंडल अधिकारी माने तिकडे आल्यानंतर पडताळणी करण्याचे ठरवून पोह/30 नरोटे, पोकॉ/766 किणगी यांना बोलावून घेतले आणि तक्रारदार आणि दोन्ही पंचांची ओळख करून देऊन गोपनीय कामकाजासाठी बाहेर जायचे असल्याचे सांगुन त्याकरीता आवश्यक सर्व साहित्य शासकीय वाहनात घेण्यास सांगितले. गोपनीय कामाकरीता आवश्यक व्हाईसरेकॉर्डर, मेमरीकार्ड, लॅपटॉप, प्रिंटर, सील, अँन्थ्रासीन पावडर, अल्ट्राव्हायोलेट दिवा इ. सर्व साहित्य ला.प्र.वि कडील शासकीय वाहन एम.एच.12 यु.सी 4108 या वाहनामध्ये ठेवण्यात आले. त्यानंतर 13.30 वा चे सुमारास शासकीय वाहनातून आम्ही, पोनि लांभाते दोन्ही शासकीय पंच व पथकातील अंमलदार असे सर्वजण बेलाटीच्या दिशेने रवाना झालो. तक्रारदार हे त्यांचेकडील होन्डा युनिकॉर्न, रजि.क्र. एम.एच.13 सी.एच. 4659 या दुचाकी वाहनावरुन बेलाटीकडे निघाले. साधारण 14.10 वा. आम्ही बेलाटी गावच्या पलीकडे संत बाळूमामा मंदिरापासून काही अंतरावर रस्त्याच्याकडेला एका झाडाखाली थांबलो. तक्रारदार गायकवाड हे आमच्या मागेच आम्ही थांबलेल्या ठिकाणी आले.

तक्रारदार यांना पंच नं.1 होळकर यांचेसह पाठवून मंडल अधिकारी माने यांची समक्ष भेट घेऊन

पडताळणी करण्याचे ठरले. त्यानंतर पोनि लांभाते यांनी तक्रारदार यांना त्यांचे मोबाईल फोनवरून मंडल अधिकारी माने यांना फोन करून ते बेलाटीमध्ये आलेत किंवा कसे याबाबत विचारणा करणेबाबत सांगितले. त्याप्रमाणे 14.34 वा. तक्रारदार यांनी मंडल अधिकारी माने यांना व्हॉट्सअँपवर कॉल करून फोन स्पिकर मोडवर ठेवले. त्यावेळी तक्रारदार यांनी हं. साहेब आलात.. अशी विचारणा केली. त्यावेळी मंडल अधिकारी माने यांनी हं देगावला हाय हित समृध्दीला हाय..असे सांगितले. त्यांनतर तक्रारदार यांनी मग मी येवू का..अशी विचारणा केली असता, मंडल अधिकारी माने यांनी मी येतो, की कुणीकडच्या साईडला हाय..अशी विचारणा केली. त्यावेळी तक्रारदार यांनी बेलाटी ब्रिज खालन ते मधला रस्ता हाय बघा समृध्दी कड जायचा बेलाटी पसन ते बारीक हं. तिथच हाय.. असे सांगितले. त्यावर मंडल अधिकारी माने यांनी म्हणजे हे समृध्दीच्याच रोडला का..असे विचारले असता, तक्रारदार यांनी हो समृध्दीच्या रोडलाच अलीकडे थांबलो असलेबाबत सांगितले. यादरम्यान तलाठी यांच्याबाबत संभाषण करून मंडल अधिकारी माने यांनी कॉल बंद केला. सदर संभाषण पोनि लांभाते यांनी व्हॉईसरेकॉर्डरद्वारे रेकॉर्ड करून घेतले.

मंडल अधिकारी माने हे श्री सोमनाथ श्रीरंग काळे यांचे बेलाटी येथील शेतामध्ये येऊन मुरूमाची स्थळ पाहणी करण्यासाठी येणार असल्याने त्याठिकाणी त्यांची पडताळणी करण्याचे ठरले. त्यानंतर आम्ही व पोनि लांभाते यांनी तक्रारदार व पंचांना पडताळणीकरीता आवश्यक सुचना देऊन व्हॉईस रेकॉर्डर चालु करून तक्रारदार यांचे गळ्यात अडकावून त्यांना पंच क्र.1 होळकर यांचेसह 14.46 वा रवाना केले. साधारण

15.23 वा चे सुमारास तक्रारदार व पंच क्र.1 होळकर असे दोघे आम्ही थांबलेल्या ठिकाणी परत आले. तक्रारदार व पंच यांना शासकीय वाहनात बोलावून घेतल्यावर पोनि लांभाते यांनी तक्रारदार गायकवाड यांच्या गळ्यातील व्हॉईसरेकॉर्डर काढून बंद केला. सदरवेळी आम्ही व पोनि लांभाते यांनी पंच क्र.1 होळकर यांना मंडल अधिकारी माने यांची भेट घेण्याकरीता गेल्यानंतर काय घडले याबाबतची हकीकत कथन करण्यास सांगितले असता पंच क्र.1 होळकर यांनी सांगितले की, “मी व तक्रारदार गायकवाड असे दोघे मोटारसायकलवरून बेलाटी ब्रिजखाली जाऊन मंडल अधिकारी माने यांची वाट पाहत उभारलो. त्यावेळी तक्रारदार यांनी मंडल अधिकारी माने यांना व्हॉट्सअँपवर कॉल करून आम्ही थांबलेल्या ठिकाणाची माहिती दिली. काहीवेळाने मंडल अधिकारी माने यांनी तक्रारदार यांना पुन्हा कॉल करून आम्ही थांबलेल्या ठिकाणाची माहिती घेतली. काहीवेळाने मंडल अधिकारी माने हे त्यांचे चारचाकी वाहनामधून बेलाटी ब्रिजखाली आले. तेव्हा तक्रारदार यांनी त्यांना हाताने इशारा केला. त्यानंतर तक्रारदार व मी दोघे मोटारसायकलवर बसून सोमनाथ काळे यांच्या शेताकडे निघालो. आमच्या पाठीमागे मंडल अधिकारी माने हे त्यांच्या कारमधून निघाले. बेलाटी ब्रिजपासून काही अंतरावर रोडच्या कडेला असलेल्या सोमनाथ काळे यांच्या शेताजवळ जाऊन आम्ही थांबलो. आमच्या पाठीमागेच माने हे सुध्दा त्याठिकाणी आले. त्यानंतर आम्ही वाहने रस्त्याच्या कडेला लावून सर्वजण चालत सोमनाथ काळे यांच्या शेतामधील विहिरीच्या दिशेने निघालो. यादरम्यान तक्रारदार गायकवाड व मंडल अधिकारी माने यांच्यामध्ये त्यांच्या कामाचे अनुषंगाने चर्चा सुरू होती. आम्ही विहीरीजवळ गेलो असता शेतकरी सोमनाथ काळे हे सुध्दा विहीरीजवळ आले. त्यावेळी मंडल अधिकारी माने यांनी खोदलेल्या विहिरीबाबत आणि विहिरीतील पाण्याबाबत तक्रारदार व शेतकरी सोमनाथ काळे यांचेशी अवांतर चर्चा केली. त्यानंतर मंडल अधिकारी माने यांनी त्याठिकाणी

विहिरीच्या बाजूस असलेल्या मुरूमाचे व सभोवतालचे मोबाईलमधून फोटो काढून घेतले. त्यानंतर मंडल अधिकारी माने यांनी चला..कुठला गट हाय असे विचारले, त्यावर तक्रारदार यांनी 163/1क/1ब असे सांगितले. त्यानंतर माने यांनी कुठुन कस हाय कुठुन कुठवर हाय..असे विचारले, तेव्हा शेतकरी सोमनाथ काळे यांनी ही बांध हाय का ती चिलार तिथून आपला रोड असे सांगितले. सदरवेळी शेती व गटाबाबत अवांतर चर्चा झाली. त्यानंतर आम्ही विहिरीपासून रस्त्याजवळ लावलेल्या वाहनाकडे निघालो. त्यावेळी मंडल अधिकारी माने यांनी त्यांच्या उजव्या हाताचे तर्जनीवर अंगठा घासून इशा-याने लाचेची मागणी केली. त्यावर तक्रारदार यांनी हाताने इशारा करून काय असे विचारणा केली. तेव्हा मंडल अधिकारी माने यांनी तक्रारदार यांच्या कानाजवळ जाऊन कानात हळू आवाजात काहीतरी बोलले, त्यावर तक्रारदार यांनी त्यांच्या दोन्ही हाताचे चार-चार बोटे दाखवून हं..हे हेवड केलोय असे सांगितले. मंडल अधिकारी माने यांनी लाचेची मागणी केल्यावर तक्रारदार यांनी दोन्ही हाताचे चार-चार बोटे दाखवून इशा-याने त्यांना 80,000/- रू. केल्याचे दर्शविले. त्यावर माने यांनी का बरं आजून का त्यात का.. हे केला..असे म्हणून मागणी केलेल्या रकमेत कमी का केला असे विचारले. त्यावर तक्रारदार यांनी पैसे नव्हते म्हणून तेवढेच केलोय असे सांगितले. त्यावर माने यांनी कस नाही नसतेत रे.. आं. पंधरा दिवस दिले एवढ..सगळ मैदान साफ केला..नंतर पैसे नाही.. आं.. असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी हयच्यात काय ऐशीं काय लाख काय एकच की..असे म्हणाले असता, माने यांनी दिड होत आपल दिडच हे हाय.. असे म्हणून दिड लाख रूपये होते असे बोलले. तेव्हा तक्रारदार यांनी दिड काय साहेब तेवढ आता धंदा पण नाही आपलं काय असे सांगितले. त्यावर माने यांनी हं.. हां..किती साईड दिल्या मी..असे म्हणाले असता, तक्रारदार यांनी तीन असे सांगितले. त्यानंतर माने यांनी ते खांडेकरचीच दोन दोनदा झाली असे म्हणाले असता, तक्रारदार यांनी ते एक फेलच गेली पहिली असे म्हणाले. त्यावर माने यांनी कुठ फेल गेली? असे विचारले. तेव्हा तक्रारदार यांनी मग पहिली असे म्हणाले. त्यानंतर माने यांनी ते साफ केला की सगळ..काय ठेवला तिथ असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी दुसरा..नाही पण..तिथ जेवढ पाहिजे तेवढ भेटल नाही त्यच्याकडन..शेतक-यांनी आडवल बंदच झाल काम असे सांगितले. त्यावर माने यांनी असली कारण नाही सांगायच.. राठोडला हिच दिल ना त्यंनी.. असे बोलत असतानाच तक्रारदार यांनी लाख देतय असे म्हणाले. त्यावर माने यांनी एका साईडला देतय तेवढ असे म्हणून तक्रारदार यांनी केलेल्या तडजोडीच्या प्रयत्नास नकार देऊन एक लाख रूपये लाचेची मागणी केली. त्यानंतर तक्रारदार यांनी मग कुठ येवू दया? असे म्हणून लाच रक्कम घेऊन कुठे येऊ असे विचारले. त्यावर मंडल अधिकारी माने यांनी कुठ म्हणजे..हितच त्यला काय असे बोलून लागलीच पैसे देण्यास सांगितले. त्यावेळी तक्रारदार यांनी काय आणलो नाही घरी हायती..येतो लगेच घेवून असे सांगितले. त्यावेळी मंडल अधिकारी माने यांनी ये जावून ये मग जा असे सांगितले. त्यावेळी तक्रारदार यांनी कुणीकड येवू दया असे विचारले असता, मंडल अधिकारी माने यांनी ऑफिसला ये असे बोलून पैसे घेऊन उत्तर तहसील कार्यालयास बोलावले. त्यानंतर तक्रारदार यांनी साडेतीन..आता घरी जाईपर्यंत पावणेचार होतेत्या..साडेचारपर्यंत येतो असे सांगितले. तेव्हा माने यांनी साडेचारपर्यंत नाही मला आमच्या आईला दवाखान्याला न्यायच हाय असे म्हणाले. तेव्हा तक्रारदार यांनी बरं. होता होईल तेवढ येतो लवकर पण तरीपण असे सांगितले. त्यानंतर मंडल अधिकारी माने व त्यांच्यासोबत आलेले दोन इसम त्यांच्या चारचाकी वाहनातून निघून गेले. त्यानंतर आम्ही पथक थांबलेल्या

ठिकाणी परत आलो.” याप्रमाणे संपुर्ण घडलेली हकिकत सांगितली.

त्यानंतर आम्ही व पोनि लांभाते यांनी तक्रारदार गायकवाड यास मंडल अधिकारी माने यांना भेटण्यास गेल्यानंतर काय घडले याची हकिकत सांगण्यास सांगितले असता, त्यांनी देखील वरीलप्रमाणे घडलेली हकीकत सांगितले. सदरवेळी आम्ही तक्रारदार गायकवाड यांना मंडल अधिकारी माने हे कानात काय बोलले असे विचारले असता तक्रारदार गायकवाड यांनी सांगितले की, "सोमनाथ काळे यांच्या शेतामध्ये मंडल अधिकारी माने यांनी आमच्या समक्ष विहिर खोदकामातून निघालेल्या मुरूमाची स्थळपाहणी करून फोटो काढून घेतले, त्यानंतर आम्ही सर्वजण शेतामधून परत जात असताना मंडल अधिकारी माने हे माझ्याशी चर्चा करत होते. चर्चेदरम्यान मंडल अधिकारी माने यांनी त्यांच्या उजव्या हाताचे तर्जनीवर अंगठा घासून इशा-याने लाचेची मागणी केली. त्यावेळी मी हाताने इशारा करून काय असे विचारले, तेव्हा मंडल अधिकारी माने यांनी माझ्या कानाजवळ जाऊन कानात हळू आवाजात लाख रूपये असे बोलून पैश्याची मागणी केली." असे सांगितले.

त्यानंतर पोनि लांभाते व आम्ही व्हॉईसरेकॉर्डर लॅपटॉपला जोडून ध्वनिमुद्रीत झालेल्या फाईलमधील संभाषणातील आवाज तक्रारदार गायकवाड यांच्याकडून ओळखून घेतला आणि पंचासमक्ष फॉरवर्ड-बॅकवर्ड करून रेकॉर्डीग फाईलमधील संभाषण ऐकुन झालेल्या संभाषणाची खात्री केली. पडताळणीदरम्यान मंडल अधिकारी माने यांनी तक्रारदार गायकवाड यांच्याकडे 1,00,000/- रू मागणी केल्याचे स्पष्ट झाले. सदर पडताळणीवेळी मंडल अधिकारी माने हे स्थळपाहणी करून तहसील कार्यालयाकडे रवाना होत असताना तक्रारदार यांना पैसे घेऊन उत्तर सोलापूर तहसील कार्यालयास येण्यास सांगितले त्यामुळे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सोलापूर कार्यालयात जाऊन सापळापुर्व कारवाई करण्याचे ठरले. त्यानंतर आम्ही, पोनि लांभाते, दोन्ही पंच व अंमलदार असे सर्वजण शासकीय वाहनातून आणि तक्रारदार हे त्यांचेकडील मोटारसायकलवरून ला.प्र.वि कार्यालयात आलो. त्यानंतर पोनि लांभाते यांनी कार्यालयातील पोहेकॉ/571 मुल्ला, पोहेकॉ/1616 जाधव यांना कक्षामध्ये बोलावून दोन्ही पंच व तक्रारदार गायकवाड यांची अंमलदारांशी ओळख करून दिली. त्यानंतर पोनि लांभाते यांनी उपस्थित अंमलदारांना तक्रारदार गायकवाड यांनी दिलेल्या तक्रारीची थोडक्यात हकिकत सांगुन तक्रारीच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या पडताळणी कारवाईची माहिती दिली. सदर पडताळणीवेळी ति-हे येथील मंडल अधिकारी माने यांनी बेलाटी येथील शेतकरी सोमनाथ काळे यांच्या शेतामधील विहिर खोदकामातून निघालेले मुरूम वाहतूक व वापराकरीता परवानगी मिळणेकरीता तहसील कार्यालयास दिलेल्या अर्जाच्या अनुषंगाने शेतामधील मुरूमाची स्थळपाहणी करून त्याचे फोटो काढून तहसील कार्यालयास अहवाल सादर करण्यासाठी तक्रारदार यांच्याकडे 1,00,000/- रू लाचेची मागणी करून लाचेची रक्कम उत्तर सोलापूर तहसील कार्यालयात घेऊन येण्यास सांगितल्याने त्याठिकाणी सापळा कारवाई करण्यात येणार असल्याचे सांगितले.

त्यानंतर तक्रारदार यांनी हजर केलेल्या नोटांचे क्रमांक टाईप करून घेणे, तक्रारदार व दोन्ही पंचांना अँन्थ्रासीन पावडरची माहिती देऊन त्याचे प्रात्यक्षिक करणे व हजर केलेल्या नोटांना पावडर लावणे इ. सापळापुर्व कारवाई करून सापळा कारवाईच्या अनुषंगाने तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा पथकातील अंमलदारांना आवश्यक त्या सुचना देण्यात आल्या. त्यानंतर तक्रारदार व दोन्ही पंचांचे 16.34 वा व्हॉईसरेकॉर्डरव्दारे निवेदन रेकॉर्ड करून घेतले. सदरचे निवेदन रेकॉर्ड करून घेताना पोह/30 नरोटे यांनी त्यांचे मोबाईलमध्ये व्हिडीओ चित्रीकरण केले. त्यानंतर पोनि लांभाते यांनी

व्हॉईस रेकॉर्डर चालु करून होल्ड मोडवर करून तक्रारदार गायकवाड यांचे गळ्यामध्ये शर्टाच्या आतमध्ये अडकावून पंच क्र.1 होळकर यांच्यासह 16.47 वा उत्तर सोलापूर तहसिल कार्यालयाकडे रवाना केले. त्यांचे पाठोपाठ आम्ही व पोनि लांभाते, पंच क्र.2, पोकॉ/766 किणगी व चालक पोकॉ/2085 शिंदे असे शासकीय वाहनातून आणि पोह/571 मुल्ला व पोह/30 नरोटे हे मोटारसायकलवरून उत्तर सोलापूर तहसील कार्यालयाच्या दिशेने रवाना झालो. त्याठिकाणी जाऊन आम्ही कार्यालयाच्या परिसरात सापळा लावून थांबलो. काहीवेळाने तक्रारदार व पंच दोघे त्यांच्या मोटारसायकलवरून ला.प्र.वि कार्यालयाच्या दिशेने परत निघाले. तेव्हा आम्ही सर्वजण त्यांच्यामागे निघालो. तक्रारदार व पंच दोघे ला.प्र.वि कार्यालयात येऊन थांबल्यावर आम्ही त्यांच्यामागे कार्यालयात आलो. त्यावेळी पोनि लांभाते व आम्ही तक्रारदार व पंचास परत का आले याबाबत विचारले असता त्यांनी सांगितले की, आम्ही उत्तर सोलापूर तहसील कार्यालयात गेलो, त्यावेळी मंडल अधिकारी माने यांची चारचाकी वाहन दिसून न आल्याने 16.50 वा. चे सुमारास तक्रारदार यांनी मंडल अधिकारी माने यांना व्हॉट्सअँपवर कॉल करून फोन स्पिकर मोडवर ठेवला. त्यावेळी मंडल अधिकारी माने यांनी फोन उचलुन काय रे? अशी तक्रारदार यांना विचारणा केली. त्यावर तक्रारदार यांनी साहेब ऑफीसला आलतो..असे सांगितले. त्यावर मंडल अधिकारी माने यांनी नाय मी घरी आलतो..असे सांगितले. त्यावर तक्रारदार यांनी घरी आलाव, मग येऊ द्या तीकड.. असे विचारले असता, त्यांनी काय करतो बघ..मी दवाखान्यात चाललो..असे सांगितले असता, तक्रारदार यांनी ती आणलो होतो ओ..असे बोलून लाच रक्कम घेऊन आलो याबाबत सांगितले. त्यावेळी मंडल अधिकारी माने यांनी दवाखान्यात चाललो आता मी..असे सांगितले. त्यावेळी तक्रारदार यांनी एक पाच दहा मिनीटात येतो आर.टी.ओ.ऑफीस..असे सांगितले असता, मंडल अधिकारी माने यांनी ये मग लवकर ये असे बोलून लाच रक्कम घेऊन घरी येण्याबाबत सांगितल्याने आम्ही त्याची माहिती देण्यासाठी ला.प्र.वि कार्यालयात आल्याचे सांगितले.

मंडल अधिकारी माने यांनी तक्रारदार यांना त्यांच्या घराकडे बोलावल्याने पोनि लांभाते यांनी विलंब न करता पुन्हा हॉईस रेकॉर्डर चालु करून तक्रारदार यांचे गळ्यामध्ये शर्टाच्या आतमध्ये अडकावून पंच क्र.1 होळकर यांचेसह मंडल अधिकारी माने यांची भेट घेण्यासाठी 17.00 वा मंडल अधिकारी माने हे राहत असलेल्या घराकडे म्हणजेच आरटीओ कार्यालयाच्या परिसरात रवाना केले. त्यांच्या पाठीमागे पोहेकॉ/30 नरोटे व पोहेकॉ/571 मुल्ला हे मोटारसायकलवरून आणि पोनि लांभाते, पंच क्र.2 पुंड, पोकॉ/766 किणगी, चालक पोकॉ/2085 शिंदे आणि आम्ही शासकीय वाहनातून आर.टी.ओ कार्यालयाच्या दिशेने निघालो. आरटीओ कार्यालयापासून पुढे जाणा-या रोडवर पाण्याच्या टाकीजवळ श्री कृष्ण दुग्धालय समोर तक्रारदार यांनी त्यांची दुचाकी थांबवली. त्यावेळी आम्हीसुध्दा शासकीय वाहनातून उतरून त्याठिकाणी सापळा लावून थांबलो. काहीवेळाने तक्रारदार गायकवाड व पंच क्र.1 हे दोघे मोटारसायकलवर बसून श्री कृष्ण दुग्धालयापासून ला.प्र.वि कार्यालयाच्या दिशेने परत निघाले. त्यावेळी पोनि लांभाते, पंच क्र.2 व अंमलदार यांच्यासह आम्ही शासकिय वाहनाने त्यांच्या पाठीमागे निघालो. ला.प्र.वि कार्यालयात आल्यानंतर पोनि लांभाते यांनी तक्रारदार यांच्या गळ्यातील व्हॉईसरेकॉर्डर बंद करून काढून घेतले. ती वेळ 17.32 वा. ची होती. त्यानंतर आम्ही व पोनि लांभाते यांनी पंच क्र.1 होळकर यांना मंडल अधिकारी माने यांची आर.टि.ओ कार्यालयाजवळ भेट घेण्यासाठी गेल्यानंतर काय झाले याबाबत विचारले असता त्यांनी सांगितले की, "मी व तक्रारदार गायकवाड

दोघे आर.टी.ओ कार्यालयापासून पुढे पाणी टाकीजवळ श्रीकृष्ण दुग्धालयसमोर मोटार सायकल लावून थांबलो. त्यावेळी तक्रारदार गायकवाड यांनी व्हॉट्सअँपवरून मंडल अधिकारी माने यांना कॉल करून फोन स्पीकरवर मोडवर ठेवला. मंडल अधिकारी माने यांनी कॉल उचलल्यावर तक्रारदार यांनी साहेब पाण्याच्या टाकीपशी हाय असे म्हणाले. त्यावर मंडल अधिकारी माने यांनी ये की इकड आत मध्ये..घराकडं ये असे सांगितले. तेव्हा तक्रारदार यांनी कुणीकड ओ..घराकड असे विचारले असता, माने यांनी ये लवकर मी निघालो असे बोलून फोन बंद केला. मंडलअधिकारी माने यांना घरी जाऊन लाचेची रक्कम दिल्यास लाच रक्कम स्वीकारल्याचा नियोजित इशारा करता येणार नाही व सापळा पथकास त्याबाबत माहिती होणार नाही आणि मंडल अधिकारी माने यांनी लाच रक्कम घेतल्यावर ते कोठे ठेवतात याबाबत नक्की माहिती होणार नाही म्हणून आम्ही तिथेच थांबलो. काहीवेळाने तक्रारदार यांनी पुन्हा मंडलअधिकारी माने यांना व्हॉट्सअँपवर कॉल केले, त्यावेळी माने यांनी फोन उचलून अरे काय झालं असे विचारले. त्यावेळी तक्रारदार यांनी साहेब पाण्याच्या टाकीकड हाय घर कुठाय घावीच नाय की असे बोलून घर सापडत नसल्याचे सांगितले, तेव्हा माने यांनी आता दहा वेळा येऊन गेला की असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी लक्षातच नाही..कुणीकडन कुणीकड जायच काय असे सांगितले. त्यावर माने यांनी ते चौडेश्वरी मंदिरपासून राईटला घ्यायच असे सांगितले. तेव्हा तक्रारदार यांनी कुठाय इथ चौडेश्वरी मंदिर..बरोबर टाकीपशीच..दोनदा फीरून फीरून आलो असे म्हणाले. तेव्हा मंडल अधिकारी माने यांनी टाकी पासून सरळच डोणगांव रोडकड जाताना उजव्या हाताला चौडेश्वरी देवीच मंदिर हाय असे सांगितले. त्यावर तक्रारदार यांनी तुम्ही येत नाय बाहेर? असे विचारले असता, माने यांनी अरे..बाहेर म्हणजे..लांब हाय माझ तीथन आतमध्ये हाय लय घर..मी आता आईला घेऊन चाललोय दवाखान्यात म्हणून सांगितल की तुला असे सांगितले. त्यानंतर काहीवेळ घराच्या पत्त्यासंदर्भाने चर्चा झाली, त्यानंतर तक्रारदार यांनी तुम्ही तिकड बाहेर या की..बाहेरल्या साईडला असे म्हणाले असता, माने यांनी ए बाहेर येत नाय मी..मी चाललोय मी जाऊदे राहुदे असे म्हणाले आणि फोन बंद केला. त्यानंतर तक्रारदार यांनी पुन्हा मंडल अधिकारी माने यांना व्हॉट्सअँपवर फोन केला. माने यांनी फोन उचलल्यावर तक्रारदार यांनी साहेब ऑफीसला मग आता येत नाव? असे विचारले. तेव्हा माने यांनी नाय नाय येत नाय असे सांगितले. तेव्हा तक्रारदार यांनी उद्याच? असे विचारले, त्यावर माने यांनी उद्या बघू असे म्हणून कॉल बंद केला. त्यामुळे आम्ही ला.प्र.वि कार्यालयाकडे परत आलो." अशी हकिकत सांगितली.

त्यानंतर पोनि लांभाते व आम्ही तक्रारदार गायकवाड यांना मंडल अधिकारी माने यांना भेटण्यासाठी गेल्यानंतर काय झाले याबाबत विचारणा केले असता त्यांनीसुध्दा पंच क्र.1 यांच्याप्रमाणे वरील घडलेली हकिकत सांगितली. त्यानंतर पोनि लांभाते यांनी व्हॉईसरेकॉर्डर लॅपटॉपला लावून सापळा कारवाईदरम्यान तक्रारदार यांचे मंडल अधिकारी माने यांच्याशी फोनवर झालेल्या संभाषणाचे ध्वनिमुद्रीत फाईल्स लावून ते माझ्या व दोन्ही पंचासमक्ष फॉरवर्ड-बॅकवर्ड करून ऐकले असता वरीलप्रमाणे संभाषण झाल्याचे दिसून आले. एकंदरीत सापळाकारवाई दरम्यान मंडल अधिकारी माने यांनी मागणी केलेली लाच रक्कम देण्याकरीता तक्रारदार व पंच क्र.1 होळकर यांना रवाना करण्यात आले होते परंतू मंडल अधिकारी माने यांनी तक्रारदार यांना त्यांचे घरी येण्यास सांगितले परंतू मंडल अधिकारी माने यांच्या घरी जाऊन लाचेची रक्कम दिल्यास सापळा पथकास त्याची माहिती देण्यास अडचण येईल याकरीता तक्रारदार यांनी घरी जाण्याचे टाळून मंडल अधिकारी माने यांना बाहेर

बोलावले असता, माने यांनी त्यांच्या आईस दवाखान्याला घेऊन जात असल्याचे सांगुन उद्या बघू असे सांगितल्याने दि.27/05/2026 रोजी पुढील कारवाई करण्याचे ठरले. त्यानंतर ला.प्र.वि कार्यालयामध्ये संभाषणाचा उतारा काढणे, पंचनामा इ. कामकाज पुर्ण करण्यात आले.
दि.27/05/2026 रोजी तक्रारदार गायकवाड व दोन्ही पंच ला.प्र.वि कार्यालयात आल्यानंतर पोनि लांभाते व आम्ही त्यांना दि.26/05/2026 रोजी करण्यात आलेल्या पडताळणी व सापळा कारवाईची उजळणी आणि दि.26/05/2026 रोजी वापरण्यात आलेले मेमरीकार्ड दाखवून त्यांचा उपयोग व वापराबाबत माहिती दिले. त्यानंतर पोनि लांभाते यांनी तक्रारदार गायकवाड व दोन्ही पंचांचे सापळापुर्व निवेदन व्हॉईसरेकॉर्डरद्वारे रेकॉर्ड करून घेतले. त्याचे व्हिडीओ चित्रीकरण पोह/30 नरोटे यांनी केले. सापळा कारवाईकरीता तक्रारदार व पंच क्र.1 यांना रवाना करण्यापुर्वी मंडल अधिकारी माने यांची नक्की कोठे भेट होऊ शकते याबाबत तक्रारदार यांना विचारले असता त्यांनी त्यांच्या मित्रास मंडल अधिकारी माने हे उत्तर सोलापूर तहसील कार्यालयात उपस्थित आहेत का हे पाहण्यासाठी तहसील कार्यालयात पाठविले होते परंतू ते कार्यालयात आलेले नाहीत, सध्या ते कोठे असू शकतील याबाबत काही कल्पना नसल्याचे सांगितले. त्यामुळे पोनि लांभाते यांनी तक्रारदार गायकवाड यांना मंडल अधिकारी माने यांच्या मोबाईलवर कॉल करून फोन स्पीकरवर ठेऊन त्यांच्याशी बोलून ते कुठे भेटू शकतील याबाबत खात्री करण्यास सांगितले. त्यानुसार तक्रारदार गायकवाड यांनी 11.47 वा. चे सुमारास त्यांचे मो.क्र.9665902034 यावरून मंडल अधिकारी माने यांचे मो.क्र.9028538264 यावर कॉल करून फोन स्पीकरवर मोडवर ठेवला परंतू मंडल अधिकारी माने यांनी तक्रारदार यांचा कॉल उचलला नाही. त्यानंतर पोनि लांभाते यांच्या सुचनेवरून तक्रारदार यांनी वरील क्रमांकाच्या व्हॉट्सअँपवरून मंडल अधिकारी माने यांना 11.48 वा कॉल केला परंतू त्यांनी तक्रारदार यांचा कॉल उचलला नाही. त्यानंतर ठराविक वेळेच्या अंतराने तक्रारदार यांनी आणखीन दोनवेळा व्हॉट्सअँपवरून मंडल अधिकारी यांना संपर्क साधण्याचा प्रयत्न केला परंतू त्यांनी तक्रारदार यांचा फोन उचलला नाही. त्यामुळे मंडल अधिकारी माने तक्रारदार यांना संपर्क करतील तेव्हा पुढील कारवाई करण्याचे ठरवून सापळा कारवाई स्थगित करण्यात आले.

मंडल अधिकारी माने हे तक्रारदार गायकवाड यांच्याकडे यापुढे लाच रकमेची मागणी करण्याची शक्यता कमी असल्याने त्यांच्यावर दि.26/05/2026 रोजीच्या लाच मागणी प्रकरणी कायदेशीर कारवाई करण्यात यावी असे तक्रारदार गायकवाड यांनी दि.08/06/2026 रोजी जबाब दिल्याने सदर कारवाई स्थगित करण्यात आली. तक्रारदार गायकवाड यांनी दिलेल्या तक्रारीच्या पडताळणी, सापळापुर्व व सापळा कारवाईवेळी आम्ही पर्यवेक्षण अधिकारी म्हणून सापळा अधिकारी पोनि लांभाते यांच्यासह उपस्थित होतो. दरम्यान पोनि लांभाते यांची बदली झाल्याने मी फिर्याद देत आहे.

तरी तक्रारदार विश्वजीत बिरू गायकवाड यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दि.26/05/2026 रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कारवाईदरम्यान उत्तर सोलापूर तहसील कार्यालयाअंतर्गत ति-हे मंडलाचे मंडल अधिकारी माने यांनी तक्रारदार गायकवाड हे बेलाटी येथील श्री सोमनाथ काळे यांच्या शेतामध्ये विहिरीच्या खोदकामातून निघालेल्या मुरूमाची वाहतूक व वापर करण्यासाठी श्री सोमनाथ काळे यांच्याशी केलेल्या करारपत्राच्या अनुषंगाने बेलाटी येथील श्री सोमनाथ काळे यांच्या शेतामधील विहिरीच्या खोदकामातून निघालेल्या मुरूमाची स्थळपाहणी करून त्याचे फोटोसह अहवाल तहसील कार्यालयास सादर करण्यासाठी 1,00,000/- रू लाच मागणी करून गैरफायदा प्राप्त करण्याचा प्रयत्न

केला आहे. म्हणून विजयकुमार जंगप्पा माने, वय - 54 वर्षे, मंडल अधिकारी ति-हे, उत्तर सोलापूर यांचेविरूध्द मी भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 चे कलम 7 प्रमाणे सरकारतर्फे कायदेशीर फिर्याद देत आहे.

माझा वरील फिर्यादी जबाब माझे सांगणेप्रमाणे टंकलिखीत करण्यात आला असून तो मी वाचून पाहीला असून माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर व खरा आहे.

**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

(1) **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** Shrishail Shindramappa Gaja (पोलीस निरीक्षक) **or (किंवा):**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव): Rank (हुद्दा):**

**No. (क्र.): to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**
**or (किंवा)**

(4) **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा): on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).**

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)**

**R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)**

**Registered by (नोंदणी अधिकारी)**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** Shrishail Shindramappa Gaja

**14.**

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)

**Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)**

**Rank (हुद्दा):** I (Inspector)

**No. (क्र.):** PCMAH85977

15. **Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / seen )**
(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील

| S. No. (अ.क्र) | Sex (लिंग) | Date / Year Of Birth (जन्मतारीख / वर्ष) | Build (बांधा) | Height (cms) (उंची(सें.मी) | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | 1972 | | - | | चेचक: क्र. |

| Deformities / Peculiarities (व्यंग / वैशिष्टये) | Teeth (दात) | Hair (केस) | Eye (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit (s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language/Dialect (भाषा/बोली) | Place of (चे ठिकाण) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोंदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल)